# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १६१–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. मल्लीनाथ विरपरसाप्पा जत्ती ,<br>मु. पो. करेवाडी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार.

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. मल्लीनाथ विरपरसाप्पा जत्ती, मु.पो. करेवाडी टी., ता. जत, जि. सांगली यांनी परिशिष्ट अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द मंचाकडे तक्रार दि. १६.७.२०१० रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार यांनी शेतीपंपास नवीन विद्युत पुरवठा मिळणेसाठी वितरण कंपनीच्या कवठे महांकाळ विभागांतर्गत संख उप विभागाकडे अर्ज देवून प्रोसेसिंग फी रु.५०/– दि. २६.४.२०१० रोजी पावती क्रमांक ५३४२८०५ नुसार भरली आहे. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली.

यापूर्वी त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र.१०६ दि. १३.५.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ५९९५ दि. १८.५.२०१० नुसार आदेश पारीत करुन कृती मानके साध्य करण्यात अपयश आलेस ग्राहक भरपाई द्यावी असे आदेश दिले. त्याच्या नाराजीने सदरची तक्रार मंचाकडे प्रतिधीमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ७.८.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी वीज पुरवठा मिळावा म्हणून दि. २६.४.२०१० रोजी प्रोसेसिंग फी भरल्याचे मान्य केले आहे. त्यांना दि. १५.६.२०१० रोजी चलन देण्यात आलेले आहे. त्यांचे ०.५४ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १७.८.२०१० रोजी सुनावणी घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. मैंलापुरे, प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता हजर. तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे यांनी तक्रारदार यांनी प्रोसेसिंग फी रु.५०/– दि. २६.४.२०१० रोजी भरल्याने त्यांना दि. २५.५.२०१० पर्यंत चलन देणे आवश्यक होते, ते दि. १५.६.२०१० ला देण्यात आले आहे असे सांगितले. तक्रारदार यांनी दि. १६.७.२०१० ला चलनाचे पैंसे भरले असून चाचणी अहवाल दिला आहे. चलन मिळण्यास ३ आठवड्यांचा विलंब झाला त्यामुळे रु.३००/– भरपाई मंजूर करावी अशी मागणी केली आहे. याउलट, वि.प.ने ९ पोलचे व ०.५४ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे असे सांगितले, परंतु तक्रारदार यांनी चलन भरल्याचे व चाचणी अहवालाबाबतचे म्हणणे मंचासमोर मांडले नाही.

तक्रारदार यांनी वि.प.कडे शेतीपंपासाठी विद्युत पुरवठा मिळावा यासाठी अर्ज करुन प्रोसेसिंग फी. रु.५०/– दि. २६.४.२०१० रोजी भरल्याचे वि.प.स मान्य आहे. वितरण मेन्सचा विस्तार असलेने १ महिना मुदतीची तरतूद उभयबाजूंना मान्य आहे, त्याबाबत दुमत नाही. तक्रारदार यांनी दि. २५.५.२०१० पर्यंत चलन मिळणे आवश्यक होते, ते त्यांना दि. १५.६.२०१० ला देण्यात आले आहे. चलन देण्यास झालेल्या विलंबाबाबत वि.प.ने कुठेही स्पष्टीकरण दिले नाही. अंतर्गत कक्षाने दि. १८.५.२०१० ला आदेश पारित करुन विलंबाबाबत भरपाई देण्याबाबत निर्देशित केले आहे. कृती मानकातील तरतुदीचे पालन करण्यात अपयश आल्याने वि.प. ग्राहक भरपाई देणेस जबाबदार आहे. त्यामुळे दि. २५.५.२०१० ते १५.६.२०१० या कालावधीतील ३ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ३००/– भरपाई तक्रारदार यांस देणेस वि. प. जबाबदार आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीचा कवठे महांकाळ विभाग / संख उप विभाग यांनी दि. २५.५.२०१० ते १५.६.२०१० या कालावधीतील ३ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ३००/– भरपाई तक्रारदार यांस भरपाई द्यावी.

३) सदरची रक्कम बिलामधून समायोजित करण्यात यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

c